MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Jr.No.41012
UGC Approved Refereed Journal

# Vidya Warta®

International Multilingual Refereed Research Journal

Issue-28, Vol-03 Oct. to Dec.2018

DR. M. K. UMATHE COLLEGE
NAGPUR

Editor
Dr.Bapu G.Gholap

PRINCIPAL
Dr. M. K. Umathe College
Nagpur - 440022

Scanned with CamScanner

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

Oct. To Dec. 2018
Issue-28, Vol-03

Date of Publication
30 Dec. 2018

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Scanned with CamScanner

14) Various Modules of Farm Business Income across Land-size Classes : A ...
**Dr. Poonam Singh, Bareilly, Uttar Pradesh** ||57

15) Barcode Technology
**Prof. Swati S. Adekar, Prof. Vaishali T. Thul & Prof. Pooja H. Rane, Nagpur** ||63

16) THE EFFECT OF GLOBLAZATION ON VARIOUS SECTOR IN INDIA (UNEMPLOYME...
**Dr. Urooj Imam, Darbhanga, Bihar** ||67

17) Significance of medicinal plants and herbs in our daily life
**Dr. Rashmi Verma, neemuch** ||72

18) माहिती तंत्रज्ञानाचा ग्रंथालय व्यवस्थापनावर प्रभाव व सायबर सुरक्षिततेचे अध्ययन
**डॉ. धनंजय वा. देवते, जिल्हा. नागपूर** ||75

19) मुंबई गिरणीकामगारांच्याचळवळी
**घोलप उर्मिला सुभाष, पुणे** ||80

20) भारतीय स्वातंत्र्य चळवळीमधील महिलांचे योगदान
**डॉ. किशन केंद्रे, ता. लोहा जि. नांदेड** ||86

21) आदिवासी साहित्यातील स्त्रीयांच्या चित्रण
**प्रा. केंद्रे सीता लक्ष्मणराव, ता. केज, जि.बीड** ||88

22) महाराष्ट्रातील खुल्या कारागृहातील कैद्यांच्या समस्या
**प्रा. विनोद खेडकर & प्रा. डॉ. एल.एच. साळोक, औरंगाबाद** ||90

23) कार्ल मार्क्सचे भांडवलशाही बाबत विचार
**डॉ. रंजना सुखदेव लांजेवार, ता. नरखेड जि. नागपूर** ||95

24) भारताच्या अंतर्गत सुरक्षेला नक्षलवादाचे आव्हान
**प्रा. प्रवीण बाबुराव मोरे, जि. धुळे** ||99

25) संत तुकारामाच्या अभंगातून येणारे ग्रामीण जीवनसंदर्भ
**प्रा. डॉ. मारोती माधवराव घुगे, जि. जालना** ||101

26) अनुदानविषयक धोरणाचा भारतीय कृषीक्षेत्रावरील परिणाम : एक अभ्यास
**मुसळे आनंद रामदास, औराद शहाजानी** ||106

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR
Scanned with CamScanner

22

# महाराष्ट्रातील खुल्या कारागृहातील कैद्यांच्या समस्या

प्रा. विनोद खेडकर
सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग,
डॉ. एम.के. उमाठे कॉलेज भामटी, नागपूर.

प्रा. डॉ. एल.एच. साळोक
सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग प्रमुख,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

**********

गुन्हेगारी ही विश्वव्यापी घटना आहे. जेथे–जेथे माणूस आहे. तेथे तेथे गुन्हेगारी आहे. व्यक्ती आपल्या गरजा समाजमान्य मार्गाने पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो. परंतु, त्याच्या त्या गरजा समाजमान्य मार्गाने पूर्ण होत नाहीत. तेव्हा तो गुन्हेगारी मार्गाने पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो. या मानवाच्या गुन्ह्यापासून समाजावर व समाजातील सभोवतालच्या वातावरणावर विघातक परिणाम होतात. त्यामुळे सामाजिक नियंत्रणाचा प्रश्न गंभीर बनतो.

समाजाला सुदृढ बनविण्यासाठी व समाजा मध्ये सुव्यवस्था व शांतता टिकवून ठेवण्यासाठी सामाजिक नियंत्रणाची आवश्यकता असते. त्यासाठी विभिन्न साधने निर्माण केलेली आहेत. त्या साधनांमध्ये नियमने, कायदा आणि शिक्षा व्यवस्थेचा समावेश होतो. सामाजिक नियंत्रणाच्या औपचारिक साधनांमध्ये कायदा, शिक्षा आणि पुरस्कार अत्यंत व्यापक अशी साधने आहेत. समाजातील परिवर्तनानुसार या व्यवस्थेतही बदल होत गेला. तद्वतच शिक्षेची संकल्पना बदलत गेली. वर्तमान काळामध्ये सुधारणात्मक सिद्धांतावर भर दिला जात आहे. कारण गुन्हेगार हा समाजातील एक घटक मानला जाऊ लागला. माणूस हा परिस्थितीशी सामावून घेतांना चुकतो, असमर्थ ठरतो म्हणून तो गुन्हा करतो त्याला समाजापासून काही काळ दूर ठेवावे परंतु, त्याला जीवन जगण्याची पुन्हा एकवार संधी द्यावी. अशा तऱ्हेचा विचार मान्य होऊ लागला. कैदी हा माणूस आहे व त्याला माणसाप्रमाणे वागवावे हा विचार आज मान्य होत आहे. गुन्हेगार हा रोगी आहे आणि त्याच्या रोगाची कारणे केवळ शारीरिक नसून काहीशी मानसिक विकृती आणि सामाजिक घटना यांच्याशी संबंधीत असतात त्याचा रोग बरा होई पर्यंत त्याला कारागृहात ठेवण्याची शिक्षा देणे हा आधुनिक दृष्टिकोन निर्माण झाला.[१] व्यक्तीकडुन गुन्हा कोणत्या कारणामुळे घडला? का घडला? त्याच्या गुन्ह्यांच्या पाठीमागे समाज हा देखिल तितकाच कारणीभूत असतो. म्हणून त्यांच्याकडे सुधारणेच्या दृष्टिकोनातून पाहिले जाऊ लागले. त्या सुधारणेचा भाग म्हणून कारागृह निर्माण केले. कैद्यांच्या सुधारणेसाठी वर्तमानात आदर्श कारागृह, केंद्रिय कारागृह, खुले कारागृह, इतर संरक्षण सेवा संस्था, त्याचप्रमाणे पॅरोल, परिविक्षा निर्माण केले गेले. त्यांना या संस्थांमधुन विविध व्यवसायाचे प्रशिक्षण, मनोरंजनाच्या, खेळाच्या, शिक्षणाच्या इत्यादी विविध सुविधा उपलब्ध करून त्यांना योग्य प्रशिक्षण देऊन पुन्हा समाजामध्ये पुनर्वसन केले जात आहे.

**खुले कारागृह (Open Prison) :**

कैद्यांच्या कारागृहातील जीवनामध्ये सुधारणा घडवून येण्यासाठी सर्वात महत्वाची भूमिका खुले कारागृह करत आहे. खुले कारागृह हा गुन्हेंगारांना सुधारणेसाठीचा आजचा सर्वात सफल प्रयोग आहे. वर्तमान स्थिती मध्ये खुले कारागृहास फक्त शिक्षा स्थान न मानता यास सुधारणेचे ठिकाण मानले जात आहे. हा मानवतावादी दृष्टिकोनाबरोबरच गुन्हेगार जन्मजात नसून तो सामाजिक, मनोवैज्ञानिक, आर्थिक व सांस्कृतिक परिस्थितीचे शिकार बनलेले असतात. अशा दृष्टिकोनातून विचार केला जातो.

भारतामध्ये कारागृह सुधारणेस १८३६ मध्ये प्रारंभ झाला. या कारागृह सुधारणेचा वास्तविक प्रारंभ १९१९–२० च्या ऑल इंडिया जेल कमिटी पासून झाला. त्याचा एक भाग म्हणून कैद्यांना सुधारणेसाठी खुले कारागृह निर्माण केले आहे. "खुले कारागृह म्हणजे एका खुल्या परिसरामध्ये ठराविक वस्तु किंवा ज्या



Scanned with CamScanner

ठिकाणी भौतिक गोष्टींची काळजी घेण्याची गरज नसते जसे की, भिंती, कुलुप, गज, लोखंड, सळई, सशस्त्र रक्षक इत्यादी अशी पद्धत स्व–सवयीने आणि स्व–जबाबदारीने किंवा काळजीने ज्या गटात असते त्या गटात तो वास्तव्यास असतो."[२] "वास्तवात खुले कारागश्ह हे सुरक्षा, संगठन, नातेवाईकांना आपल्या इच्छेनुसार भेटणे व कैद्यांद्वारे दिवसा आपल्या इच्छेनुसार बाजारामध्ये येण्याजाण्याच्या स्वातंत्र्याच्या दृष्टिने खुले आहे"[३]

थोडक्यात खुले कारागृह हे असे कारागृह आहे की, ज्यामध्ये स्वच्छंद जीवन, अडविणारी दरवाजे, कुलुप व गज नसलेले ठिकाण, कारागृहाचे प्रशासन हे विश्वासावर चालत आहे आणि कैद्यांमध्ये आत्म–संयमाची भावना विकसीत होत जाते व आपल्या सहकाऱ्यांप्रती उत्तरदायीत्वाची भावना स्वत: निर्माण होते.

पहिले खुले कारागश्ह विट्जवील (पत्र्रूपस) इ.स. १८९१ मध्ये स्वित्झरलँड मध्ये स्थापन केले. विट्जवील ही ओटो केल्लेरहाल यांची कल्पना होती.[४] त्यानंतर संपूर्ण विश्वामध्ये खुले कारागृह स्थापन होण्यास सुरूवात झाली. १९१६ यु.एस.ए., १९३० ब्रिटेन मध्ये खुले कारागृह स्थापन झाले खऱ्या अर्थाने खुल्या कारागृहास १९५० मध्ये जास्त लोकप्रियता मिळाली. हेग येथे भरलेल्या १२ वी आंतरराष्ट्रीय शिक्षा संस्था आणि सुधारणागश्ह या परिषदे मध्ये खुले कारागृह चळवळीस चालना मिळाली. या परिषदेचा अजेंडा होता की, "To what extant can open institution replace the traditional prison." या परिषदेमध्ये खुले कारागृहाची तत्वे बनविण्याचा प्रयत्न केला. याच दृष्टिकोनातून भारतामध्ये इ.स. १९०५ मध्ये बॉम्बे प्रेसिडेंसी (Bombay Presidency) या खुल्या संस्थेची स्थापना केली.[५] परंतु, इ.स. १९१० मध्ये ही प्रायोगिक पद्धत बंद केली. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर काही तज्ञांनी याकडे लक्ष वेधले. उत्तरप्रदेश राज्यामध्ये डॉ. संपूर्णानंद यांच्या अध्यक्षतेखाली ०१ ऑक्टोबर, १९५२ मध्ये वाराणसी जिल्ह्यातील चकिया तहसिल अंतर्गत चंद्रप्रभा नदीवर पुल निर्मितीच्या हेतूने भारतामध्ये पहिले खुले शिबीर आयोजित केले.[६] याच दृष्टिकोनातून कैद्यांची सुधारणा चांगले वर्तन घडवून आणण्यासाठी त्यांच्या उपचाराचा भाग म्हणून महाराष्ट्र राज्यात येरवडा (पुणे) या ठिकाणी ०४ जून १९५५ मध्ये खुले कारागृह स्थापन करण्यात आले.[७] त्यांनंतर औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण या ठिकाणी १९६८ मध्ये अमरावती जिल्ह्यातील मोर्शी व. २०१५ मध्ये गडचिरोली या ठिकाणी व २०१० मध्ये येरवडा मध्ये महिलांसाठी खुले कारागृह स्थापन केले.

खुल्या कारागृहाचे तत्वज्ञान बंदिस्त कारागृहातील प्रशासन, शिस्त, सुव्यवस्थित अमलबजावणी समस्यांचे निराकरण करणे इत्यादी आधारावर वेगळे आहे. खुले कारागृह प्रशासनाची पद्धत दृढविश्वास, सहिष्णूता, सहनशिलता, सत्य आणि पूर्णत: या तत्वावर आधारलेला आहे. यामध्ये कैद्यांच्या सुधारणा आणि पुनर्वसनास प्रमुख महत्व दिले आहे. यामधून काही प्रमुख घटक समोर आले आहेत. त्यामध्ये स्वावलंबन, स्व–आदर, जबाबदारीची जाणीव व सामाजिक उपयोगिता, अधिकारांची जाणीव स्वत:कडे आणि समाजाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनामध्ये आणि कैद्यांच्या वर्तनामध्ये परिवर्तन इत्यादी.[८]

याच दृष्टिकोनातून प्रस्तुत शोध निबंधामध्ये कैदी कारागृहात असतांना त्यांच्या सुधारणेस अडथळा निर्माण करणारे महत्वपूर्ण घटक म्हणजे विविध समस्या होय. म्हणून या समस्यांचा अभ्यास केला आहे.

**पद्धतीशास्त्र :**

कोणत्याही विषयाच्या संशोधनासाठी निश्चित कार्ययोजना तयार करावी लागते. तसेच ज्या विषयाचे अध्ययन करायचे आहे त्या विषयाची मांडणी ही उद्दिष्ट पूर्ण असावी.

**समग्र संशोधनाचे अध्यक्ष क्षेत्र :**

प्रस्तुत संशोधनासाठी महाराष्ट्रातील खुले कारागृह हे अभ्यास विषयाचे विश्व आहे. महाराष्ट्रातील खुले कारागृह येरवडा (पुणे), जिल्हा खुले कारागृह पैठण (औरंगाबाद), जिल्हा खुले कारागृह मोर्शी (अमरावती) व खुले कारागृह गडचिरोली या चार खुल्या कारागृहांची निवड केली आहे.

**संशोधन उद्दिष्टे :**

१) खुल्या कारागाहातील कैद्यांचा आरोग्य



DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

Scanned with CamScanner

विषयक समस्यांचा अभ्यास करणे.

२) खुल्या कारागाहातील कैद्यांचा आहार विषयक समस्यांचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहितकृत्ये :**

१) खुल्या कारागाहातील कैद्यांना आरोग्य विषयक समस्यांना मोठ्या प्रमाणात सामोरे जावे लागते.

२) खुल्या कारागाहातील जेवणाच्या निकृष्ठ दर्जामुळे कैद्यांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे.

**नमुना निवड :**

प्रस्तुत संशोधनासाठी महाराष्ट्रातील चार खुल्या कारागृहामधुन संभाव्यता नमुना निवड पद्धतीतील यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने ३०० कैद्यांची निवड करण्यात आली आहे.

**तथ्य संकलनाच्या पद्धती :**

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अनुषंगाने तथ्य संकलनासाठी प्राथमिक आणि दुय्यम तथ्य स्त्रोतांचा उपयोग केला आहे. प्रस्तुत संशोधनामध्ये प्राथमिक तथ्य संकलनासाठी मुलाखत अनुसूची या तथ्य संकलन तंत्राचा उपयोग केला आहे. तसेच दुय्यम स्त्रोतांमधिल प्रकाशित व अप्रकाशित लिखान, शोधनिबंध, केंद्र व राज्य समित्यांचे अहवाल, शोध प्रबंध, लघुशोध प्रबंध, ग्रथ, लेख, मासिके, वर्तमानपत्रे आणि इंटरनेट वेबसाईट इत्यादींचा उपयोग केला आहे.

**तालिका क्र. १**

**खुल्या कारागृहातील कैद्यांच्या समस्या**

| अ.क्र. | कैद्यांच्या समस्या | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | समस्या येतात | २४६ | ८२: |
| २. | समस्या येत नाही | ५४ | १८: |
| | एकूण | ३०० | १००: |

प्रस्तुत संशोधनामध्ये खुल्या कारागृहामध्ये कैद्यांना येणाऱ्या समस्यांचा अभ्यास केला असता असे लक्षात आले की, ८२: (२४०) कैद्यांना समस्या येतात तर १८: कैद्यांना कोणत्याही समस्या येत नाहीत.

यावरून असे म्हणता येते की, खुल्या कारागृहातील कैद्यांना विविध समस्यांना सामोरे जावे लागते.खुल्या कारागृहामध्ये असतांना कैद्यांना आरोग्य विषयक, शिक्षण विषयक, मानसिक, कामाविषयी व उष्णता अशा विविध समस्या निर्माण होत आहेत. त्यामुळे कैद्यांच्या सुधारणा व पुनर्वसनावर प्रभाव पडत आहे.

**सारणी क्र. २**

**खुल्या कारागृहातील कैद्यांच्या समस्यांचे स्वरूप**

| अ.क्र. | कैद्यांच्या समस्यांचे स्वरूप | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | आरोग्य विषयक | २५ | १०.१६: |
| २. | शिक्षण विषयक | ०५ | २.०३: |
| ३. | मानसिक | १० | ४.०६: |
| ४. | कामाविषयी | ३१ | १२.६१: |
| ५. | उष्णता | — | — |
| ६. | आरोग्य विषयक, मानसिक व उष्णता | ०३ | १.२१: |
| ७. | मानसिक व कामाविषयी | १८ | ७.३१: |
| ८. | आरोग्य विषयक, मानसिक व कामाविषयी | ६७ | ७.३१: |
| ९. | आरोग्य विषयक व मानसिक | ४८ | १९.५२ |
| १०. | आरोग्य विषयक व कामाविषयी | ३३ | १३.४२: |
| ११. | आरोग्य विषयक व शिक्षण विषयक | ०६ | २.४४: |
| | एकूण | २४६ | १००: |

प्रस्तुत संशोधनामध्ये खुल्या कारागृहामध्ये कैद्यांना येणाऱ्या समस्येचा अभ्यास केले असता असे लक्षात आले की, एकूण ८२: कैद्यांना खुल्या कारागृहामध्ये विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. पैकी आरोग्य विषयक समस्या असणाऱ्या कैद्यांचे प्रमाण १०.१६: (२५) असून शिक्षण विषयक समस्या असणाऱ्या कैद्यांचे प्रमाण २.०३: (०५) आहे. तर मानसिक समस्या असणाऱ्या कैद्यांचे प्रमाण ४.०६: (१०) असून कामाविषयी समस्या असणाऱ्या कैद्यांचे प्रमाण १२.६१: (३१) आहे. आरोग्य, मानसिक व उष्णता विषयक समस्या असणाऱ्या कैद्यांचे प्रमाण १.२१: (०३) असून मानसिक व कामाविषयी समस्या असणाऱ्या कैद्यांचे प्रमाण ७.३१: (१८) आहे. तर आरोग्य, मानसिक व कामाविषयी समस्या असणाऱ्या कैद्यांचे प्रमाण २७.२४: (६७) आहें. आरोग्य व मानसिक समस्या असणाऱ्या कैद्यांचे प्रमाण १९.४२: (४८) असुन आरोग्य विषयक व कामाविषयी समस्या असणाऱ्या कैद्यांचे प्रमाण १३.४२: (३३) असुन आरोग्य व शिक्षण विषयक समस्या असणाऱ्या कैद्यांचे प्रमाण २.४४: (०६) आहे.

यावरून असे दिसून येते की, खुल्या कारागृहामध्ये आरोग्य विषयक समस्या असणाऱ्या कैद्यांचे



Scanned with CamScanner

प्रमाण ६०: सर्वाधिक आहे. कारण कैदी जेव्हा कारागृहात असतो तेव्हा कारागृहातील वातावरण व परिस्थितीचा प्रभाव त्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर होत असतो. खुल्या कारागृहामध्ये करावे लागत असलेले काम, अन्नाचा दर्जा, तेथील अस्वच्छता, अयोग्य आहार, निम्न दर्जाची औषधे, वाढते वयोमान, जास्त काम करावे लागणे इत्यादींमुळे कैद्यांना आरोग्य विषयक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. तर ४८.६६: कैद्यांना मानसिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. कारण व्यक्ती जेव्हा कारागृहात असतो तेव्हा तो आपल्या कुटूंबापासून दूर एकटाच असतो. तसेच कुटूंबाची असलेली काळजी, कुटूंबाची उदनिर्वाहाची असलेल्या समस्या, मुलांच्या भविष्या विषयी काळजी इत्यादी विचारांमुळे कैद्यांमध्ये मानसिक ताण निर्माण होतो.

तालिका क्र. ३

खुल्या कारागृहामध्ये उत्तरदाता आजारी असल्याची स्थिती

| अ. क्र. | कैद्यांची आजारी असण्याची स्थिती | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | एक वेळेस | १३७ | ४५.६७: |
| २. | दोन वेळेस | ५५ | १८.३३: |
| ३. | एकदा ही नाही | १०८ | ३६.००: |
| | एकूण | ३०० | १००: |

खुल्या कारागृहात असतांना कैदी आजारी पडला किंवा नाही म्हणजेच त्याच्या आरोग्याची स्थिती जाणून घेतली असता असे लक्षात आले की, ६४: कैदी कारागृहामध्ये असतांना आजारी पडले होते पैकी ४५.६७: (१३७) कैदी एक वेळेस आजारी पडले तर दोन वेळेस आजारी पडणाऱ्या कैद्यांचे प्रमाण १८.३३: (५५) आहे. कारागृहात असतांना कैद्यांना कारागृहातील अस्वच्छता, दुषित वातावरण, बदलते वातावरण, अयोग्य आहार, जास्त काम करावे लागणे आणि वाढते वयोमानाचा परिणाम त्यांच्या शारीरिक आरोग्यावर होतो. त्यामुळे कैदी आजारी पडतात.

सारणी क्र. ४

खुल्या कारागृहातील जेवणाचा दर्जा व त्यामुळे कैद्यांच्या आरोग्यावर झालेला परिणाम.

| अ.क्र. | जेवणाचा दर्जा | जेवणामुळे कैद्यांच्या आरोग्यावर झालेला परिणाम | | | कोणतीही समस्या नाही | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सतत आजारी पडतो | शारीरिक थकवा येतो | कोणताही परिणाम नाही | | | |
| १. | चांगले जेवण दिले जात नाही. | १४ ८.०४: | १११ ६३.८०: | ४९ २८.१६: | — | १७४ | ५८ |
| २. | जेवण वेळेवर दिले जात नाही | — | — | — | — | — | — |
| ३. | पुरेसे जेवण दिले जात नाही | — | — | — | — | — | — |
| ४. | धान्य निकृष्ठ दर्जाचे वापरले जाते | — | ०६ १००: | — | — | ०६ | ०२ |
| ५. | चांगले जेवण दिले जात नाही व धान्य निकृष्ठ दर्जाचे | ०५ १६.१२ | १९ ६१.२९: | ०७ २२.५९: | — | ३१ | १०.३३ |
| ६. | कोणतीही समस्या नाही | — | — | — | ८९ | ८९ | २९.३३ |
| | एकूण | १९ ६.३३: | १३६ ४५.३३: | ५६ १८.३४: | ८९ २९.६७: | ३०० | १००: |

कैदी कारागृहामध्ये असतांना त्यांच्या आरोग्यावर सर्वात मोठा प्रभाव कारागृहातील जेवणाच्या दर्जाचा असतो. त्याच दृष्टिकोनातून प्रस्तुत संशोधनामध्ये खुल्या कारागृहातील जेवणाचा दर्जा व त्यामुळे कैद्यांच्या आरोग्यावर झालेल्या परिणामाचा अभ्यास केला असता असे दिसून आले की, चांगले जेवण दिले जात नाही असे मत असणाऱ्या कैद्यांचे प्रमाण ५८: (१७४) असून पैकी, ८.०४: (१४) कैदी सतत आजारी पडतात. तर ६३.८०: (१११) कैद्यांना शारीरिक थकवा जाणवत असून २८.१६: (४९) कैद्यांवर कोणताही परिणाम होत नाही. तसेच ०२: (०६) कैद्यांमते खुल्या कारागृहा मध्ये धान्य निकृष्ठ दर्जाचे वापरले जाते. त्याच बरोबर १०.३३: (३१) कैद्यांमते चांगले जेवण दिले जात नाही व धान्य निकृष्ठ दर्जाचे वापरले जात असून पैकी सतत आजारी पडणाऱ्या कैद्यांचे प्रमाण १६.१२: (०५) असून शारीरिक थकवा येणाऱ्या कैद्यांचे प्रमाण ६१.२९: (१९) आहे. तसेच २९.३७: (८९) कैद्यांना जेवणाच्या दर्जाविषयी कोणतीही तक्रार नाही. परंतु, यातील बहुतांश कैदी स्वयंपाक गृहामध्ये काम करतात म्हणून त्यांना याविषयी तक्रार नाही.

यावरून असे दिसून येते की, बहुतांश कैद्यांच्या मते खुल्या कारागृहातील जेवणाचा दर्जा चांगला नसून त्यामुळे शारीरिक थकवा येवून कैद्यांच्या आरोग्यावर परिणाम झाला आहे. माले ई अलेक्जेंडर यांनी कैद्यांना दिल्या जाणाऱ्या जेवणा विषयी वर्णन केले आहे की, कारागरहातील जेवणाचा दर्जा व पुरेसे जेवण कैद्यांसाठी महत्वपूर्ण आहे. कारागृहातील जीवन अधिकाधिक



DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR
Scanned with CamScanner

असुरक्षीत व निराशाजनक असते ते सुखकर बनविण्यासाठी त्यांच्या दैनंदिन जीवनातील एक महत्वाचा घटक म्हणून जेवणाचा दर्जा, योग्य वेळी जेवण व पुरेसे जेवण दिले तर त्यांच्या अनेक समस्यांचा निपटारा त्याच ठिकाणी होवू शकतो.[९] परंतु, खुल्या कारागृहातील दर्जा निकृष्ठ असल्यामुळे त्यांच्या शारीरिक आरोग्यावर परिणाम झाला आहे.

**निष्कर्ष :**

१) खुल्या कारागशहातील ८२: कैद्यांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. यामध्ये आरोग्य, शिक्षण, काम व मानसिक समस्या प्रमुख आहेत.

२) खुल्या कारागशहामध्ये आरोग्य विषयक समस्या असणाऱ्या कैद्यांचे प्रमाण ६०: सर्वाधिक आहे. खुल्या कारागृहामध्ये करावे लागत असलेले काम, अन्नाचा दर्जा तेथील अस्वच्छता, अयोग्य आहार, निम्न दर्जाची औषधे, वाढते वयोमान, जास्त करावे लागणारे काम इत्यादींमुळे कैद्यांना आरोग्य विषयक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

३) बहुतांश कैदी खुल्या कारागृहामध्ये आजारी पडले होते. कारागृहात असतांना कैद्यांना कारागृहातील अस्वच्छता, दुषित वातावरण, अयोग्य आहार, जास्त काम करावे लागणे आणि वाढते वयोमानाचा परिणाम त्यांच्या शारीरिक आरोग्यावर होतो त्यामुळे कैदी आजारी पडतात.

४) बहुतांश कैद्यांमते खुल्या कारागृहातील जेवणांचा दर्जा चांगला नसुन त्यामुळे शारीरिक थकवा येवून कैद्यांच्या आरोग्यावर परिणाम झाला आहे.

५) बंदिस्त कारागृहापेक्षा खुल्या कारागृहातील जेवणाचा दर्जा उत्तम आहे.

६) १३.१३: कैद्यांना खुल्या कारागृहामध्ये मुळव्याध, किडणीस्टोन, मानेचा गॅप, दमा, शुगर, पॅरालीसीस इत्यादी सारखे आजार झाले आहेत.

**संदर्भ सूची :—**

१) काळदाते सुधा, शुभांगी गोटे—गव्हाणे. २००३. 'गुन्हेगारीचे समाजशास्त्र (अपराध शास्त्र)', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, पृ.क्र. १६.

२) Parajape N.V. 2005. 'Criminology and Penology', Central Law Publications, Allahabad. 2, Ad 12, P.No. 391

३) लवानिया एम.एम. और जैन शशी के. १९८७. 'अपराधशास्त्र' रिसर्च पब्लिकेशन, जयपूर, पृ.क्र. १७७

४) Howard Jones, Paul Cornes, Richard Stock Ford. 1977. 'Open Prison', Routledge and Kegan Paul Publication, London, enely and Boston, P.No. 4

५) Datir R.N. 1978. 'Prison as a social system', Popular Prakashan, Bombay, P.No. 376

६) Gaur K.D. 1992. Criminal Law, Criminology and Criminal Administration, "Vasta I.C., Open Peno Correctional Institutions", Deep and Deep Publications, New Delhi, P.N. 771

७) Varma Paripurnanand. 1963. 'Crime, Criminal and Convict.' Ram Prasad and Sons, Agra, P.No. 208

८) Ghosh S. 1992. 'Open, Prison and the Inmates (A Socio-Psychological Study)', Mittal Publication, New Delhi.

९) Alexander Myrl E. 1957. 'Jail Administration,' Springfied Elinaus, Charles C. Thoms, P.No. 109.

❑❑❑

PRINCIPAL
Dr. M. K. Umathe College
Nagpur - 440022



Scanned with CamScanner